आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता
२८ डिसेंबर २०२५ - वार

**ठळक बातम्या**

- आगामी वर्षात नव्या आशा आणि संकल्पांसह पुढे जाण्यासाठी देश सज्ज असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्या युतीची घोषणा

- अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवर पर्यावरण तज्ञांच्या आक्षेपाची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल, उद्या सुनावणी होणार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, टी-ट्वेंटी मालिकेतल्या चौथ्या सामन्यात भारताचं श्रीलंकेपुढं विजयासाठी २२२ धावांचं आव्हान

**<><><><><>**

२०२५ या सरत्या वर्षानं भारताला मोठा आत्मविश्वास दिला असून, आता देश २०२६ मध्ये नवी आशा आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी सज्ज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधत होते. हा या कार्यक्रमाचा १२९ वा भाग होता. २०२५ या वर्षाने प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला लावणारे क्षण दिल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. देशाच्या सुरक्षेपासून खेळांच्या मैदानापर्यंत आणि विज्ञानाच्या प्रयोगशाळांपासून ते जगभरातील मोठ्या व्यासपीठांपर्यंत भारताने प्रत्येक ठिकाणी आपला मजबूत ठसा उमटवला असं ते म्हणाले. सरत्या वर्षातलं ऑपरेशन सिंदूर प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचं प्रतीक बनलं असून, आजचा भारत आपल्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड करत नाही, हे जगानं पाहिल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

क्रीडा क्षेत्रासाठी २०२५ हे वर्ष संस्मरणीय ठरल्याचं नमूद करून, प्रधानमंत्र्यांनी भारताच्या पुरुष क्रिकेट संघानं जिंकलेली आयसीसी चॅम्पियन्स करंडक स्पर्धा, महिला

क्रिकेट संघाचं पहिलंवहिलं विश्वजेतेपद, दृष्टीहीन महिला क्रिकेट संघानं जिंकलेली पहिली टी-२० विश्वचषक स्पर्धा या यशाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

प्रयागराज महाकुंभचं आयोजन आणि अयोध्येत राम मंदिरावर ध्वजारोहण कार्यक्रमाने प्रत्येक भारतियाचा ऊर अभिमानानं दाटून आल्याचं ते म्हणाले.

देशातल्या युवा शक्तीमुळे जग भारताकडे मोठ्या आशेने पाहत आहे असं त्यांनी सांगितलं. विज्ञान क्षेत्रातली आपली कामगिरी, नाविन्यपूर्ण संशोधन, तंत्रज्ञानाचा विस्तार यामुळे जगभरातले देश खूप प्रभावित झाले असल्याचं ते म्हणाले.

अँटीबायोटिक औषधांच्या अविचारी वापरामुळं निर्माण झालेल्या धोक्याविषयी त्यांनी आजच्या मन की बात मध्ये सांगतलं.

आपल्या पारंपरिक कला या समाजाच्या सक्षमीकरणासह, लोकांच्या आर्थिक प्रगतीचं मोठं माध्यम बनल्याचं सांगून, त्यांनी याबाबत देशभरात सुरु असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती दिली.

२०२५ मधला हा 'मन की बात' चा शेवटचा भाग असल्याचं नमूद करून, २०२६ हे वर्ष 'विकसित भारत' या संकल्पाच्या पूर्ततेच्या प्रवासातला एक महत्त्वाचा टप्पा ठरो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

- **- होल्ड बाईट - MKB SHUBHECHHA - -**

- **<><><><><>**

काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीनं मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठी आघाडीची घोषणा केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित आघाडीचे नेते धैर्यवर्धन पुंडकर यांनी आज संयुक्त वार्ताहर परिषदेत या आघाडीची घोषणा केली. या आघाडीअंतर्गत मुंबईतल्या २२७ जागांपैकी ६२ जागा वंचित बहुजन आघाडी लढवणार आहे.

राज्यातल्या इतर २८ महापालिकांसाठीही आघाडीची चर्चा सुरू असल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची राष्ट्रवादी काँग्रेसशी युतीची बोलणी फिसकटल्यानंतर महाविकास आघाडीच्या घटक

पक्षांमधे आघाडीचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी ही माहिती दिल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. या आघाडीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि वंचित बहुजन आघाडीलाही सामावून घेण्याची आपल्या पक्षाची तयारी असल्याचं काकडे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र सरकारनं यावर्षी विविध उपक्रम राबवले आहेत. नव्या भारताच्या उभारणीसाठी कोणकोणती धोरणं आखण्यात आली याविषयी जाणून घेऊया....

**--------------व्हीसी----------------**

(भारताच्या विकासाच्या प्रवासात २०२५ हे वर्ष अतिशय महत्त्वाचं ठरलं. रेल्वे, रस्ते, विमान वाहतूक, सागरी वाहतूक अशा सर्व क्षेत्रांमधल्या पायाभूत सुविधांमधे यावर्षी मोलाची भर पडली. दुर्गम भागापासून मोठ्या शहरांपर्यंत संपर्काचं जाळं तयार झालं. यात काही टप्पे हे ऐतिहासिक आहेत. मिझोराम हे ईशान्य भागातलं राज्य प्रथमच भारताच्या रेल्वेजाळ्याशी जोडलं गेलं. मिझोराममध्ये बांधला गेलेला बैराबी-सैरांग हा ५१ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग ८ हजार कोटी रुपये खर्चून बांधला गेला आहे. यामुळे आता ऐझॉलसह अन्य भागात पिकणारा शेतमाल आणि अन्य सामग्रीची वाहतूक कमी खर्चात होणार आहे. याशिवाय उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पांतर्गत जगातला सर्वात उंच पूल असलेल्या चिनाब रेल्वे पुलाचं उद्घाटन करण्यात आलं. यामुळे काश्मीर खोरं उर्वरित देशाशी जोडलं जाणार आहे. याशिवाय बिहारमध्ये पहिली वंदे भारत रेल्वे, दिल्ली-मेरठ भागात जलद वाहतूक प्रणालीचं उद्घाटन असे काही महत्त्वाचे टप्पे यंदा गाठले. भारताचं मेट्रोजाळंही यंदा २४८ किलोमीटर वरून १ हजार १३ किलोमीटर पर्यंत वाढलं आहे. शहरी वाहतूक विस्ताराच्या गतीमुळे भारत आता जगातलं तिसरं सर्वात मोठं मेट्रो जाळं असलेला देश बनला आहे. देशातल्या राष्ट्रीय महामार्गांच्या जाळ्याची लांबी मार्च २०१९मध्ये १ लाख ३२ हजार ४९९ किलोमीटर होती, ती यंदा १ लाख ४६ हजार ५६० किलोमीटरपर्यंत वाढली आहे. चौपदरी आणि त्यापेक्षा अधिक पदरी महामार्गांची लांबी ३१ हजार ६६ वरून ४३ हजार ५१२ किलोमीटर इतकी झाली आहे.)

**<><><><><>**

अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली असून, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि ए.जी. मसीह यांचा समावेश असलेल्या सुट्टी-कालीन पिठासमोर उद्या या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. अरावली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येवर मोठ्या प्रमाणात निषेध आणि आक्षेप नोंदवला गेल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयानं हा हस्तक्षेप केला.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये, आज केरळमध्ये तिरुअनंतपुरम इथं सुरु असलेल्या चौथ्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं श्रीलंकेपुढं विजयासाठी २२२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. भारतानं निर्धारित २० षटकात अवघ्या दोन गड्यांच्या मोबदल्यात २२१ धावा केल्या. त्यात श्रृती मंधानाच्या तडाखेबंद ८० आणि शेफाली वर्माच्या ७९ धावांचा मोलाचा वाटा आहे. या दोघींनी पहिल्या गड्यासाठी १६२ धावांची भागिदारी केली.

<><><><><>

विजयवाडा इथं झालेल्या ८७ व्या वरिष्ठ गट राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत ऋत्विक संजीव एस. यानं पुरुष एकेरीचं जेतेपद पटकावलं. त्यानं अंतिम सामन्यात भारत राघव याचा २१-१६, २२-२० अशा थेट गेम्समध्ये पराभव केला. पुरुष दुहेरीत ए. हरिहरन आणि रुबन कुमार या जोडीनं मिथिलेश कृष्णन आणि प्रेजन यांचा २४-२२, २१-१७ असा पराभव करून विजेतेपद पटकावलं.

महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यात माजी विजेत्या शिखा गौतम आणि अश्विनी भट के. या जोडीनं प्रिया देवी कोंजेनबम आणि श्रुती मिश्रा या जोडीचा पराभव करून पुन्हा एकदा जेतेपद आपल्या नावे केलं आहे.

मिश्र दुहेरीत सात्विक रेड्डी के. आणि राधिका शर्मा यांनी विजेतेपद पटकावलं. या जोडीनं अंतिम सामन्यात अशिथ सूर्या आणि अमृता पी. या जोडीचा २१-९, २१-१५ असा पराभव केला.

<><><><><>

केंद्रीय संसदीय आणि अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरण रिजिजू यांनी आज कर्नाटकच्या उत्तर कनारा जिल्ह्यात मुंडगुड इथं संपन्न झालेल्या तिबेटी बौद्ध संमेलनाला संबोधित केलं. या सम्मेलनात तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा उपस्थित होते. दलाई लामा यांनी दाखवलेली अहिंसा आणि करुणेची वाट संघर्ष आणि कलहाच्या गर्तेत सापडलेल्या जगभरातल्या देशांसाठी मार्गदर्शक असल्याचं रिजिजू यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी आज कर्नाटकातल्या कारवारमधल्या कदंब नौदलतळाला भेट दिली. कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गेहलोत यांनी त्यांचं स्वागत केलं. नौदलतळाला भेट दिल्यानंतर राष्ट्रपतींनी स्वदेशी बनावटीच्या कलवरी श्रेणीतली आयएनएस वाघशीर या पाणबुडीतून प्रवास केला. नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी त्यांच्यासोबत होते. पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या त्या माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यानंतरच्या दुसऱ्या राष्ट्रपती आहेत.

**//<><><><><>//**